दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। मंगळवार, दि. ९ जून २०२६ । वर्ष १ ।अंक ६४ ।पाने २।
DIGITAL EDITION

डंपरखाली चिरडून ३८ वर्षीय कामगाराचा मृत्यू (पान २ वर)




» Selected

## महाराष्ट्रात मान्सूनची दमदार आगेकूच

मुंबई: महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशात पुढील टप्प्यात प्रवेश करत वेगाने आगेकूच केली आहे. भारतीय हवामान विभागाने (IMD) सोमवारी याबाबत अधिकृत माहिती देत मान्सून आता महाराष्ट्राच्या आणखी काही भागांपर्यंत पोहोचल्याचे स्पष्ट केले. यामुळे राज्यातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, मुंबईतही १४ ते १५ जूनदरम्यान मान्सून दाखल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. सध्या मान्सूनची उत्तरी सीमा हर्णे, सोलापूर, कलबुर्गी, नांदयाल, चेन्नई, लॅमडिंग आणि नॉर्थ लखीमपूर या भागांतून पुढे सरकत आहे. दरम्यान, कोकण किनारपट्टीवरील काही भागांमध्ये तुरळक ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाच्या सरी कोसळल्या असून, राज्यातील इतर अनेक जिल्ह्यांमध्येही मान्सूनपूर्व वादळी पावसाने हजेरी लावली आहे.

### विधान परिषद निवडणुकीत अंतर्गत संघर्ष उफाळला

# जळगाव महायुतीत शह-काटशहाचे राजकारण!

## शिवसेनेत खळबळ; पाठिंब्याच्या राजकारणाने महायुतीतील समीकरणे बदलण्याची चिन्हे

जन सम्राट टाईम्स

**जळगाव : विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्ह्यात महायुतीमधील अंतर्गत राजकारण चांगलेच तापले असून, शिवसेना आणि महायुतीतील घटक पक्षांमध्ये शह-काटशहाचे डावपेच उघडपणे समोर येऊ लागले आहेत.**

जळगाव आणि नाशिक या दोन्ही जागांवर उमेदवारी आणि पाठिंब्याच्या राजकारणामुळे महायुतीतील प्रमुख पक्षांमध्ये पडद्यामागील हालचाली वेगाने सुरू असून, आगामी निर्णयांवरच निवडणुकीचे समीकरण अवलंबून राहणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. जळगाव विधान परिषद निवडणुकीत शिवसेनेच्या बंडखोर उमेदवार रेश्मा काळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर पक्षांतर्गत अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले. सुरुवातीला या उमेदवारीपासून अंतर राखणारे काही स्थानिक पदाधिकारी आता मात्र पडद्यामागून काळे यांच्या पाठीशी उभे असल्याचे चित्र दिसून



येत आहे. त्यामुळे अधिकृत भूमिका आणि प्रत्यक्षातील राजकीय हालचाली यामध्ये तफावत असल्याची चर्चा रंगू लागली आहे. रेश्मा काळे यांनीही प्रचारात आक्रमक भूमिका घेत विविध मतदारांशी थेट संपर्क साधण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी रावेर, भुसावळ तसेच जळगाव महापालिकेतील नगरसेवक आणि मुक्ताईनगर परिसरातील स्थानिक प्रतिनिधींशी वैयक्तिक संवाद साधून आपली मोर्चेबांधणी मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू केल्याचे समजते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांशी सातत्याने संपर्क ठेवून पाठिंबा मिळविण्यावर त्यांचा भर असल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे. दुसरीकडे, शिवसेनेचे विद्यमान आमदार आणि काही वरिष्ठ पदाधिकारी संपूर्ण घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. त्यांनी अद्याप कोणतीही स्पष्ट भूमिका जाहीर न करता 'वेट अँड वॉच'ची रणनीती स्वीकारल्याचे दिसून येत आहे. अंतिम क्षणी बदलणाऱ्या राजकीय समीकरणांचा विचार करूनच पुढील पाऊल टाकण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याची चर्चा आहे. महायुतीतील या घडामोडींमुळे नाशिक विधान परिषद मतदारसंघातील परिस्थितीचाही परिणाम जळगावच्या राजकारणावर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दोन्ही ठिकाणच्या जागांबाबत अंतिम निर्णय आणि पाठिंब्याची भूमिका स्पष्ट झाल्यानंतरच राजकीय डावपेच अधिक वेगाने आखले जातील, असे सूत्रांचे म्हणणे आहे.


### राजकीय समीकरणांना नवे वळण

विधान परिषद निवडणुकीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतांना असलेले महत्त्व लक्षात घेता प्रत्येक मत निर्णायक ठरणार आहे. त्यामुळे महायुतीतील अंतर्गत मतभेद, बंडखोरी आणि पाठिंब्याचे बदलते समीकरण यामुळे निवडणुकीत अनपेक्षित घडामोडी घडू शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. सध्या सर्वांचे लक्ष महायुतीच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या अंतिम निर्णयाकडे लागले असून, येत्या काही दिवसांत होणाऱ्या घडामोडी जळगावसह उत्तर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणांना नवे वळण देऊ शकतात.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## एसटी च्या कारभाराविरोधात रिपब्लिकन सेनेचे आंदोलन!

### पोलिसांच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी:** एसटी महामंडळाच्या कथित भ्रष्ट कारभाराविरोधात सुरू असलेल्या आंदोलनाला सोमवारी नाट्यमय वळण मिळाले. रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष समाधान बैस यांनी आपल्या सहकाऱ्यांसह जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची घटना घडली. मात्र, पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून त्यांना ताब्यात घेतल्याने मोठा अनर्थ टळला. मिळालेल्या माहितीनुसार, रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष समाधान बैस यांनी एसटी महामंडळातील कथित भ्रष्टाचार आणि गैरकारभाराविरोधात ७ मे २०२६ पासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. आंदोलनाद्वारे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे. यापूर्वीही केले होते रास्ता रोको आंदोलन आंदोलनाची दखल घेतली जात नसल्याचा आरोप करत रिपब्लिकन सेनेच्या वतीने २४ मे २०२६ रोजी बसस्थानक परिसरात रास्ता रोको व चक्काजाम आंदोलन करण्यात आले होते.

यावेळी संबंधित अधिकाऱ्यांवर

### सहकाऱ्यांनी आत्मदहनाचा प्रयत्न केला

दोन दिवसांच्या आत मागण्या मान्य न झाल्यास आत्मदहन करण्याचा इशाराही समाधान बैस यांनी दिला होता. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात आत्मदहनाचा प्रयत्न आज दुपारी सुमारे दोन वाजेच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात समाधान बैस आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांनी आत्मदहनाचा प्रयत्न केला.

## महागाई, बेरोजगारी आणि शेतकरी प्रश्नांवर शिवसेनेचा एल्गार

### हाताने बैलगाडी ओढत शासनाविरोधात अनोखा मोर्चा; शिरपूर प्रांताधिकारी कार्यालयावर धडक

जन सम्राट टाईम्स

**शिरपूर | प्रतिनिधी:** वाढती महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न, वीज समस्या आणि अपूर्ण कर्जमाफीच्या मुद्द्यांवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शिरपूर येथे भव्य मोर्चा काढण्यात आला. टाळ-मृदुंगाच्या गजरात, महिलांनी गॅस सिलेंडरची आरती करत आणि कार्यकर्त्यांनी हाताने बैलगाडी ओढत शासनाच्या धोरणांविरोधात अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला. या मोर्चाने शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले. शिरपूर शहरातील प्रमुख मार्गांवरून निघालेला मोर्चा प्रांताधिकारी कार्यालयावर धडकला. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन प्रांताधिकाऱ्यांमार्फत शासनाकडे पाठविण्यात आले. मोर्चादरम्यान शासनाच्या विरोधात



जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. शेतकरी, बेरोजगार आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर आवाज शिवसेनेच्या वतीने शिंदखेडा आणि शिरपूर तालुक्यातील वीजपुरवठा समस्या, शेतकरी कर्जमाफीतील त्रुटी, सिंचन व्यवस्था, पाणीटंचाई, वाढती बेरोजगारी आणि महागाई या प्रमुख प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले. मोर्चात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांनी वाढत्या घरगुती गॅस दरांमुळे सर्वसामान्य महिलांचे अर्थकारण कोलमडल्याचा आरोप केला. त्याचप्रमाणे शेतीमालाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचेही आंदोलनकर्त्यांनी नमूद केले. गॅस सिलेंडरची आरती अन् बैलगाडीचे प्रतीकात्मक आंदोलन मोर्चाचे मुख्य आकर्षण म्हणजे महिलांनी केलेली गॅस सिलेंडरची आरती आणि कार्यकर्त्यांनी हाताने ओढलेली बैलगाडी. वाढत्या इंधन आणि गॅस दरांविरोधातील संताप व्यक्त करण्यासाठी हे प्रतीकात्मक आंदोलन करण्यात आले. टाळ-मृदुंगाच्या गजरात निघालेल्या या मोर्चामुळे शहरातील वातावरण आंदोलनमय झाले होते. नागरिकांनीही रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून मोर्चाचे निरीक्षण केले. शासनाने तातडीने दखल घ्यावी मोर्चानंतर प्रांताधिकारी कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये शेतकरी, बेरोजगार युवक, महिला आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.

## झोपडपट्टी सुरक्षा दलाचा ३१ वा वर्धापन दिन उत्साहात

### सामाजिक प्रश्नांवर संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार

जन सम्राट टाईम्स

**पुणे,।प्रतिनिधी:** झोपडपट्टीवासीयांचे हक्क, कामगारांचे प्रश्न, सामाजिक न्याय आणि सर्वसामान्य जनतेच्या विविध समस्यांसाठी सातत्याने लढा देणाऱ्या झोपडपट्टी सुरक्षा दल या संघटनेचा ३१ वा वर्धापन दिन पुण्यात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. हडपसर येथील ससाणे नगरमधील म्हाडा कॉलनी परिसरात नव्या शाखा कार्यालयाचे उद्घाटन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भगवानराव वैराट यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पुणे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर निलेश मगर यांच्या हस्ते शाखा कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष सुरूच राहणार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना संस्थापक अध्यक्ष भगवानराव वैराट यांनी संघटनेच्या ३१ वर्षांच्या वाटचालीचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन, घरकुल, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण, श्रमजीवी कामगारांचे हक्क, महिलांवरील अत्याचार, बेरोजगारी, दलितांवरील अत्याचार, महागाई, शेतकरी प्रश्न तसेच खाजगी सावकारीविरोधातील लढ्यांमध्ये संघटनेने सातत्याने आक्रमक भूमिका घेतली आहे. "गेल्या तीन दशकांपासून मोर्चे, आंदोलने, धरणे आणि विविध लोकशाही मार्गांनी जनतेचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचविण्याचे काम संघटनेने केले आहे. भविष्यातही जनकल्याणासाठी आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी संघर्ष अधिक तीव्र करण्यात येईल," असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. सामाजिक कार्यकर्त्यांचा सन्मान या कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा आणि भारतीय संविधानाची प्रत प्रदान करण्यात आली.

### मान्यवरांची उपस्थिती


कार्यक्रमास नगरसेवक खंडू लोंढे, प्रा. आसमा शेख, इम्तियाज मोमीन, हरिभाऊ वाघमारे, काशिनाथ गायकवाड, मोहम्मद शेख, दत्ता डाडर, सुरेखा भालेराव, गणेश लांडगे, वंदना पवार, बाळासाहेब सुपेकर, दिना शेखर, संजय बंडे, शिवाजी भिसे, प्रवीण सपकाळ, अभिजीत ननावरे, चंद्रकांत कांबळे, श्याम सोनवणे, वैशाली अवघडे, पल्लवी कंदकल, दीपक आटोळे, गणेश गायकवाड, नितीन बोराडे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जय इंडस्ट्रीजमध्ये लागलेल्या आगीमुळे खळबळ

### सिलेंडर बाहेर काढल्याने दुर्घटना टळली

जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी :** जळगाव एमआयडीसी परिसरातील एका कुलर निर्मिती कंपनीला भीषण आग लागल्याची घटना सोमवारी उघडकीस आली. एमआयडीसीमधील जय इंडस्ट्रीज या कंपनीत अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीची तीव्रता इतकी होती की कंपनीच्या परिसरातून मोठ्या प्रमाणात धुराचे लोट आकाशात पसरल्याचे पाहायला मिळाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाला तातडीने पाचारण करण्यात आले. काही मिनिटांतच अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. अनेक तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. धुरामुळे परिसरात भीतीचे वातावरण आगीमुळे कंपनी परिसरात काळ्या धुराचे मोठे लोट उसळल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. आग नेमकी कशामुळे लागली याबाबत सुरुवातीला कोणतीही माहिती उपलब्ध नव्हती. मात्र, आगीचा वेग पाहता परिसरातील नागरिक आणि अन्य औद्योगिक युनिटधारकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले होते. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनीही घटनास्थळी गर्दी केली. पोलिस आणि अग्निशमन विभागाने परिस्थिती नियंत्रणात ठेवत नागरिकांना सुरक्षित अंतरावर राहण्याच्या सूचना दिल्या. गॅस सिलेंडर वेळेत हटवल्याने टळला मोठा अनर्थ या घटनेतील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे कंपनी परिसरात ठेवण्यात आलेले गॅस सिलेंडर वेळेत सुरक्षितस्थळी हलविण्यात आले. आग लागल्यानंतर तातडीने



सिलेंडर बाहेर काढण्यात आल्यामुळे संभाव्य स्फोटाचा धोका टळला.सिलेंडरपर्यंत आगीने पोहोचले असते तर परिस्थिती अधिक गंभीर होण्याची शक्यता होती. त्यामुळे अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे आणि कर्मचाऱ्यांच्या जागरूकतेमुळे मोठी दुर्घटना टळल्याचे बोलले जात आहे. नुकसानीचा अंदाज अद्याप स्पष्ट नाही आगीमुळे कंपनीचे नेमके किती नुकसान झाले, याची अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

### अग्निशमन दलाच्या तत्परतेचे कौतुक

कंपनीतील यंत्रसामग्री, कच्चा माल किंवा इतर साहित्याचे किती नुकसान झाले याचा आढावा घेतला जात आहे. तसेच आग लागण्यामागील नेमके कारणही अद्याप अस्पष्ट असून संबंधित विभागांकडून तपास सुरू करण्यात आला आहे. शॉर्टसर्किट, तांत्रिक बिघाड किंवा अन्य कारणांमुळे आग लागली का, याचा शोध घेतला जात आहे. अग्निशमन दलाच्या तत्परतेचे कौतुक घटनेनंतर एमआयडीसी परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. मात्र, अग्निशमन दलाच्या वेगवान प्रतिसादामुळे आणि वेळेवर करण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे आग नियंत्रणात आणण्यात यश आले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## कृषी महाविद्यालयाच्या पडीत जमिनीमुळे शेतकऱ्यांचा संताप

### वन्यप्राण्यांना आळा घालण्याची मागणी, धुळे शिवारातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान

जन सम्राट टाईम्स

**धुळे|प्रतिनिधी:** धुळे शहरालगत असलेल्या वरखेडा व धुळे शिवार परिसरातील शेतकऱ्यांनी कृषी महाविद्यालयाच्या ताब्यातील अनेक वर्षांपासून पडीत असलेल्या जमिनीमुळे वाढलेल्या वन्यप्राण्यांच्या उपद्रवाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर कृषी महाविद्यालयाच्या प्राचार्यांना निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली असून, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, कृषी महाविद्यालयाच्या ताब्यातील विस्तीर्ण क्षेत्रातील मोठा भाग




गेल्या अनेक दशकांपासून पडीत असून त्या ठिकाणी काटेरी झुडपे, उंच गवत आणि दाट जंगल तयार झाले आहे. परिणामी नीलगाय, रानडुक्कर आणि इतर वन्य प्राण्यांचे या परिसरात कायमस्वरूपी वास्तव्य निर्माण झाले असून, हे प्राणी रात्रीच्या वेळी शेजारील शेतांमध्ये घुसून उभ्या पिकांची मोठ्या प्रमाणात नासधूस करत आहेत. परिसरातील बहुतांश शेतकरी अल्पभूधारक असून त्यांचा उदरनिर्वाह पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. सततच्या पिकांच्या नुकसानीमुळे त्यांना आर्थिक फटका बसत असून अनेक वेळा तक्रारी करूनही संबंधित यंत्रणांकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. शेतकऱ्यांनी आपल्या निवेदनातून कृषी महाविद्यालयाच्या ताब्यातील संपूर्ण पडीत क्षेत्राची तातडीने साफसफाई करून काटेरी झुडपे व जंगल हटविण्याची मागणी केली आहे.

तसेच वन्य प्राण्यांचा शेतांमध्ये प्रवेश रोखण्यासाठी संपूर्ण परिसराला मजबूत संरक्षक कुंपण उभारावे, वन विभाग आणि जिल्हा प्रशासनाच्या समन्वयातून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे. याशिवाय भविष्यात वन्यप्राण्यांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास संबंधित जबाबदारी निश्चित करून शेतकऱ्यांना योग्य नुकसानभरपाई देण्यात यावी, तसेच ज्या उद्देशाने शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या तो उद्देश प्रभावीपणे पूर्ण होत नसेल आणि जमीन दीर्घकाळ पडीत राहत असेल, तर शासनाने संपूर्ण प्रकरणाचा पुनर्विचार करून संबंधित शेतकऱ्यांना न्याय देण्याचा निर्णय घ्यावा, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

### शेतकऱ्यांसमोर आणखी एक गंभीर समस्या

सदर प्रश्न हा शेतकऱ्यांच्या उपजीविकेशी थेट संबंधित असल्याने कृषी महाविद्यालय प्रशासनाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. अन्यथा परिसरातील शेतकरी संघटितपणे लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यास बाध्य होतील, असा स्पष्ट इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे आधीच नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आणखी एक गंभीर समस्या उभी राहिली असून, प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याचे मत परिसरातून व्यक्त होत आहे.

# धरणगावात खळबळ! गुन्ह्याचा छडा; मुख्य सूत्रधारासह तिघांना अटक!

## स्थानिक गुन्हे शाखा व धरणगाव पोलिसांची संयुक्त कारवाई

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव शहरातील मातोश्री कॉम्प्लेक्स परिसरात घडलेल्या गंभीर गुन्ह्याचा अवघ्या काही दिवसांत छडा लावत धरणगाव पोलीस आणि जळगाव स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने मोठे यश संपादन केले आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधारासह तीन आरोपींना अटक करण्यात आली असून एका १७ वर्षीय विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपींकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली दुचाकी आणि ९० हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली असून न्यायालयाने आरोपींना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. वाणी गल्ली येथील रहिवासी व किराणा व्यावसायिक भगवान आत्माराम माळी (वय ७२) यांनी याप्रकरणी धरणगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. ४ जून २०२६ रोजी रात्री साडेदहा ते अकराच्या सुमारास मातोश्री कॉम्प्लेक्स परिसरात हा गुन्हा घडला होता. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०४(२), ३०९ व ३(५) अन्वये गुन्हा क्रमांक २१८/२०२६ दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन धरणगाव पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची चक्रे वेगाने फिरवली.

गोपनीय माहितीच्या आधारे कंडारी रोडवरील युक्ता हॉटेलच्या मागील मोकळ्या जागेत संशयित आरोपी थांबून असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ सापळा रचून प्रमोद प्रकाश पारधी (वय २०, रा. रामपुरा, ता. चोपडा), राहुल अनंत सोनवणे (वय २२, रा. दहिवद, ता. अमळनेर) आणि एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली लाल-काळ्या रंगाची हिरो कंपनीची मोटारसायकल (एमएच-१९-डीजे-६५५३) जप्त करण्यात आली. पोलिसी चौकशीत



आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर या संपूर्ण कटाचा सूत्रधार सूरज उर्फ मुन्ना अनिल पचरेवार (वय ३०, रा. रामदेवजी बाबा नगर, धरणगाव) असल्याचे समोर आले. तक्रारदाराचा मुलगा चेतन भगवान महाजन याच्याशी १० ते १२ दिवसांपूर्वी झालेल्या वादातून त्याने हा कट रचल्याचे तपासात निष्पन्न झाले. वादानंतर चेतन महाजन याला "तुला बघून घेतो" अशी धमकी देण्यात आली होती. त्यानंतर चोपडा व अमळनेर येथील आरोपींना सोबत घेऊन हा गुन्हा घडवून आणल्याचे उघड झाले. पोलिसांनी तातडीने कारवाई करत मुख्य सूत्रधार सूरज पचरेवार यालाही अटक केली. आरोपींच्या अंगझडतीदरम्यान विधीसंघर्षग्रस्त बालकाकडून १० हजार रुपये, प्रमोद पारधीकडून ५० हजार रुपये आणि राहुल सोनवणेकडून ३० हजार रुपये अशी एकूण ९० हजार रुपयांची रोकड हस्तगत करण्यात आली. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर विधीसंघर्षग्रस्त बालकाला त्याच्या आईच्या ताब्यात देण्यात आले. ही कारवाई पोलीस निरीक्षक सुनील पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शेखर डोमाळे, संतोष पवार, विष्णू बिराडे, दीपक माळी, रावसाहेब पाटील, चंदन पाटील, सुमित बाविस्कर, महेंद्र बागुल, मिलिंद भामरे आणि किशोर भोई यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

### चौकशीत आरोपींनी दिली गुन्ह्याची कबुली

उर्वरित मुद्देमाल हस्तगत करणे तसेच आरोपींनी यापूर्वी अशाच प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याचा तपास सुरू आहे. पोलीस उपनिरीक्षक संतोष काशिनाथ पवार यांनी आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. प्राथमिक चौकशीत या गुन्ह्याची व्याप्ती आणखी मोठी असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून आरोपींकडून आणखी रोकड आणि महत्त्वाची माहिती मिळण्याची अपेक्षा पोलिसांनी व्यक्त केली आहे. गोपनीय माहितीच्या आधारे कंडारी रोडवरील युक्ता हॉटेलच्या मागील मोकळ्या जागेत संशयित आरोपी थांबून असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ सापळा रचून प्रमोद प्रकाश पारधी राहुल अनंत सोनवणे आणि एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेतले. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली लाल-काळ्या रंगाची हिरो कंपनीची मोटारसायकल (एमएच-१९-डीजे-६५५३) जप्त करण्यात आली. पोलिसी चौकशीत आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर या संपूर्ण कटाचा सूत्रधार सूरज उर्फ मुन्ना अनिल पचरेवार असल्याचे समोर आले. तक्रारदाराचा मुलगा चेतन भगवान महाजन याच्याशी १० ते १२ दिवसांपूर्वी झालेल्या वादातून त्याने हा कट रचल्याचे तपासात निष्पन्न झाले. वादानंतर चेतन महाजन याला "तुला बघून घेतो" अशी धमकी देण्यात आली होती.

---

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# डंपरखाली चिरडून ३८ वर्षीय कामगाराचा मृत्यू

## मध्यरात्रीची घटना; चालक फरार

जन सम्राट टाईम्स




**भुसावळ । प्रतिनिधी:** तालुक्यातील सुनसगाव शिवारात मध्यरात्री घडलेल्या भीषण अपघातात रेतीने भरलेल्या डंपरखाली चिरडून ३८ वर्षीय कामगाराचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. सुदर्शन पेपर मिलसमोर मोकळ्या जागेत झोपलेल्या मजुराच्या अंगावर डंपरचे चाक गेल्याने हा अपघात झाला. घटनेनंतर चालकाने मदत करण्याऐवजी डंपरसह घटनास्थळावरून पलायन केल्याने संताप व्यक्त होत आहे. मृत कामगाराची ओळख राजा भैया नथू (वय ३८, रा. धरदुवा, उत्तर प्रदेश) अशी झाली आहे.दररोजप्रमाणे काम आटोपल्यानंतर ते कंपनीसमोरील मोकळ्या जागेत झोपले होते. रिव्हर्स घेताना घडला भीषण अपघात मिळालेल्या माहितीनुसार, ४ जूनच्या मध्यरात्री सुमारे २.५० वाजेच्या सुमारास एमएच-१९-झेड-८३८८ क्रमांकाचा रेतीने भरलेला डंपर रिव्हर्स घेत असताना चालकाचे खाली झोपलेल्या मजुराकडे लक्ष गेले नाही. परिणामी डंपरचे चाक राजा भैया नथू यांच्या अंगावरून गेल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची जाणीव होऊनही चालकाने जखमी कामगाराला उपचारासाठी रुग्णालयात नेण्याचा किंवा पोलिसांना माहिती देण्याचा कोणताही प्रयत्न केला नाही.

उलट डंपरसह घटनास्थळावरून फरार होत जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करण्यात येत आहे. अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया या प्रकरणी भुसावळ तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात डंपर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.


---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# नशिराबाद पुलावरील बंद लाईटमुळे नागरिक त्रस्त

## दिवे दुरुस्त करण्याची मागणी

जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद । प्रतिनिधी :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील नशिराबाद पुलावर गेल्या काही दिवसांपासून स्ट्रीट लाईट बंद असल्याने वाहनचालक आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. पुलावरील काही दिवे सुरू असून अनेक दिवे बंद अवस्थेत असल्यामुळे ठिकठिकाणी अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी वाहतुकीच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नशिराबाद येथील या पुलावरून दररोज हजारो लहान-मोठी वाहने ये-जा करतात. विशेषतः रात्रीच्या वेळी वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र, पुलावर काही ठिकाणी प्रकाश आणि काही ठिकाणी पूर्ण अंधार असल्याने वाहनचालकांना रस्त्याचा योग्य अंदाज येत नाही. अचानक प्रकाशातून अंधारात प्रवेश होत असल्याने वाहनांचा वेग नियंत्रित करणे कठीण होत असून अपघाताची शक्यता वाढली आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, अर्धवट कार्यरत असलेल्या प्रकाश व्यवस्थेमुळे केवळ वाहनचालकच नव्हे तर पादचारीदेखील धोकादायक परिस्थितीचा सामना करत आहेत. पुलावरून पायी जाणाऱ्या नागरिकांना अंधारामुळे रस्ता ओलांडताना किंवा समोरून येणाऱ्या वाहनांचा अंदाज घेताना अडचणी निर्माण होत आहेत. काही भागात दिवे सुरू असल्यामुळे प्रकाशाची सुविधा उपलब्ध आहे, मात्र त्यानंतर लगेचच बंद दिव्यांमुळे काळोख असल्याने वाहनचालकांचा संभ्रम वाढतो. यामुळे विशेषतः दुचाकीस्वार आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ही परिस्थिती अधिक धोकादायक ठरत असल्याचे नागरिकांनी सांगितले.स्थानिक नागरिक व वाहनधारकांनी संबंधित विभागाने या समस्येची तातडीने दखल घ्यावी आणि पुलावरील सर्व बंद असलेले स्ट्रीट लाईट त्वरित दुरुस्त करून सुरू करावेत, अशी जोरदार मागणी केली आहे.

### भविष्यात अपघात घडण्याची शक्यता

वेळेत उपाययोजना न झाल्यास भविष्यात गंभीर अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची भीतीही व्यक्त केली जात आहे. महामार्गावरील सुरक्षित आणि सुरळीत वाहतुकीसाठी प्रकाश व्यवस्था अत्यंत महत्त्वाची असल्याने संबंधित प्रशासनाने तातडीने आवश्यक दुरुस्ती करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा परिसरातील नागरिकांनी व्यक्त केली आहे.

---

# नरडाणा पोलिसांची धडक कारवाई; घरफोडी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश!

## तीन आरोपी आणि एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात

जन सम्राट टाईम्स

**नरडाणा, । प्रतिनिधी :** शिंदखेडा तालुक्यातील डाबली, मेलाणे आणि नरडाणा परिसरात घरफोडी व चोरीच्या घटनांना अंजाम देणाऱ्या टोळीचा नरडाणा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात तीन आरोपींसह एका विधीसंघर्षग्रस्त बालकाला ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्या ताब्यातून तब्बल २ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

डाबलीतील घरफोडीनंतर तपासाला वेग मिळालेल्या माहितीनुसार, दि. ६ जून २०२६ रोजी मध्यरात्री ते ७ जून रोजी पहाटेच्या दरम्यान डाबली (ता. शिंदखेडा, जि. धुळे) येथील रहिवासी अरुण मुरलीधर पाटील (वय ४३) यांच्या राहत्या घरात अज्ञात चोरट्यांनी प्रवेश करून लोखंडी कपाट फोडले. त्यानंतर सुमारे ७४ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम, बेंटेक्स पोत तसेच चार्जिंगला लावलेला मोबाईल असा ऐवज लंपास करण्यात आला. या प्रकरणी नरडाणा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १०९/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३३१(४) व ३०५ अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला. गोपनीय माहितीच्या आधारे टोळी जेरबंद गुन्ह्याचा तपास सुरू असताना



नरडाणा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश मोरे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पोलिसांनी सापळा रचून संशयितांना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये गोरख सुरेश पवार (वय १९), गोकुळ छगन भिल (वय २०), बादल राजू सोनवणे (वय १८), सर्व रा. नरडाणा, ता. शिंदखेडा, जि. धुळे, तसेच एका विधीसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे. अनेक घरफोड्यांची कबुली पोलिसांनी चौघांकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी डाबली, मेलाणे आणि नरडाणा परिसरातील विविध घरफोड्या व चोरीच्या घटना केल्याची कबुली दिली. याशिवाय हातचलाखीने सहा मोबाईल चोरी केल्याचाही खुलासा आरोपींनी चौकशीत केला. २.७६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत आरोपींकडून चोरीतील सोन्याचे दागिने, मोबाईल फोन, रोख रक्कम आणि इतर साहित्य असा एकूण २ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी या टोळीच्या इतर गुन्ह्यांचाही तपास सुरू केला असून, आणखी काही चोरीच्या घटनांचा उलगडा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पोलिसांच्या कारवाईचे कौतुक गोपनीय माहितीच्या आधारे अल्पावधीतच आरोपींना जेरबंद करून मोठा मुद्देमाल हस्तगत करण्यात नरडाणा पोलिसांना यश आल्याने नागरिकांनी या कारवाईचे स्वागत केले आहे. परिसरात वाढत्या घरफोड्यांच्या घटनांवर अंकुश बसण्यास या कारवाईची मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### गोपनीय माहितीच्या आधारे टोळी जेरबंद

गुन्ह्याचा तपास सुरू असताना नरडाणा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश मोरे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार पोलिसांनी सापळा रचून संशयितांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये गोरख सुरेश पवार (वय १९), गोकुळ छगन भिल (वय २०), बादल राजू सोनवणे (वय १८), सर्व रा. नरडाणा, ता. शिंदखेडा, जि. धुळे, तसेच एका विधीसंघर्षग्रस्त बालकाचा समावेश आहे.

---

# वाडे परिसरात पुन्हा अवकाळीचा तडाखा; केळीसह पिकांचे मोठे नुकसान

## आठवडाभरात दुसऱ्यांदा वादळ-पावसाचा फटका

जन सम्राट टाईम्स

**भडगाव । प्रतिनिधी :** भडगाव तालुक्यातील वाडे परिसरात रविवारी (दि. ७ जून) सायंकाळी झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळामुळे केळीसह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आठवडाभरापूर्वीच झालेल्या नैसर्गिक आपत्तीतून शेतकरी सावरत असतानाच निसर्गाने पुन्हा एकदा जोरदार तडाखा दिल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला आहे. दि. ३१ मे रोजी झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळामुळे परिसरातील केळी व इतर पिकांचे मोठे नुकसान झाले होते. त्यावेळी महसूल व कृषी विभागाने तातडीने पंचनामे करून नुकसानीची नोंद घेतली होती. मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे पुन्हा एकदा रविवारी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास आलेल्या वादळाने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढवल्या आहेत. केळीच्या बागा आडव्या; सोलर प्लेटचेही नुकसान वादळी वाऱ्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या केळीच्या बागा जमीनदोस्त झाल्या असून इतर पिकांचेही नुकसान झाले आहे. तसेच शेतकरी राजू बाबुराव माळी यांच्या शेतातील सोलर प्लेटचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे. परिसरातील अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे समोर येत असून नुकसानीचा नेमका आकडा पंचनाम्यानंतर स्पष्ट होणार आहे. संकटातून




### शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला

मात्र निसर्गाच्या लहरीपणामुळे पुन्हा एकदा रविवारी सायंकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास आलेल्या वादळाने शेतकऱ्यांच्या अडचणी वाढवल्या आहेत. केळीच्या बागा आडव्या; सोलर प्लेटचेही नुकसान वादळी वाऱ्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या केळीच्या बागा जमीनदोस्त झाल्या असून इतर पिकांचेही नुकसान झाले आहे. तसेच शेतकरी राजू बाबुराव माळी यांच्या शेतातील सोलर प्लेटचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे. परिसरातील अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याचे समोर येत असून नुकसानीचा नेमका आकडा पंचनाम्यानंतर स्पष्ट होणार आहे.संकटातून सावरण्याआधीच दुसरा घाव एकीकडे शेतीमालाला अपेक्षित भाव नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

सावरण्याआधीच दुसरा घाव एकीकडे शेतीमालाला अपेक्षित भाव नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. त्यातच अवकाळी पाऊस आणि वादळामुळे सलग दुसऱ्यांदा पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी वर्ग घायाळ झाला आहे. अस्मानी संकटामुळे शेतीवर अवलंबून असलेल्या कुटुंबांपुढे मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. तातडीने पंचनामे करून मदतीची मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी महसूल व कृषी विभागाने तातडीने पंचनामे करून शासनाकडे अहवाल सादर करावा आणि नुकसानभरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी केली आहे. याबाबत तहसीलदार शीतल सोलाट, तालुका कृषी अधिकारी दीपक ठाकूर आणि वाडेचे तलाठी कल्याण पाटील यांना नुकसानीची माहिती देण्यात आली आहे. प्रशासनाकडून सोमवारी (दि. ८ जून) सकाळपासून पंचनामे सुरू करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

---

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# यावल तालुक्यात वादळाचा तडाखा; केळीच्या बागा जमीनदोस्त

## आ. जावळे यांची नुकसानग्रस्त भागांना भेट; तातडीने पंचनामे करण्याचे प्रशासनाला निर्देश

जन सम्राट टाईम्स

**यावल । प्रतिनिधी:** यावल तालुक्यात शनिवारी (दि. ६ जून) सायंकाळी अचानक आलेल्या वादळाने मोठ्या प्रमाणावर हाहाकार माजवला. अनेक ठिकाणी वृक्ष उन्मळून पडले, तर शेकडो एकरांवरील केळी पिकांचे मोठे नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर आमदार अमोल जावळे यांनी नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून तातडीने पंचनामे करण्याचे आदेश महसूल प्रशासनाला दिले आहेत. दुपारी साडेचार ते पाच वाजेच्या सुमारास आलेल्या



वादळामुळे भुसावळ व फैजपूर मार्गावर प्रत्येकी दोन वृक्ष कोसळले. त्यामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. तहसीलदार मोहनमाला नाझिरकर यांनी तात्काळ संबंधित यंत्रणेला सूचना देऊन रस्त्यावर पडलेले वृक्ष हटविण्याची कार्यवाही केली. त्यानंतर वाहतूक पूर्ववत सुरू करण्यात आली. वडोदे प्र. सावदा येथील सर्व्हे लाईट इंग्लिश मीडियम स्कूलच्या इमारतीवरील पत्रे वादळामुळे उडून गेली. सध्या शाळांना सुट्टी असल्याने विद्यार्थी उपस्थित नसल्यामुळे मोठी जीवितहानी टळली. वादळाचा सर्वाधिक फटका केळी उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. राजोरा शिवारातील शेतकरी सतीश रूपचंद पाटील यांच्या शेतातील सुमारे ५ हजार केळीची झाडे जमीनदोस्त झाली. याशिवाय सांगवी, राजोरा, पिंपरूड, वडोदे प्र. सावदा आणि परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या केळी बागांचे मोठे नुकसान झाले आहे. वादळामुळे झालेल्या नुकसानीची माहिती मिळताच आमदार अमोल जावळे यांनी तहसीलदार मोहनमाला नाझिरकर यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर रविवारी (दि. ७ जून) आमदार जावळे यांनी तहसीलदारांसह राजोरा, वडोदे प्र. सावदा, अंजाळे व परिसरातील नुकसानग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी संबंधित गावांचे तलाठी तसेच महसूल विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

### शेतकऱ्यांकडून मदतीची अपेक्षा

अचानक आलेल्या वादळामुळे केळी उत्पादकांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शासनाने तातडीने पंचनामे पूर्ण करून नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी प्रभावित शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

---

# रोटवद येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात चोरी

जन सम्राट टाईम्स

**रोटवद | प्रतिनिधी :** रोटवद येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्रीच्या सुमारास धाडसी चोरी करत दानपेटी फोडून त्यातील रोकड लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे भाविकांमध्ये संतापाची लाट उसळली असून मंदिर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना रात्री अंदाजे १ ते १.३० वाजण्याच्या दरम्यान घडली असावी. चोरट्यांनी प्रथम मंदिराच्या प्रवेशद्वारावरील कुलूप जड वस्तू अथवा दगडाच्या साहाय्याने फोडून मंदिरात प्रवेश केला. त्यानंतर मंदिरातील दानपेटी जागेवरून उचलून तिचे कुलूप तोडण्यात आले. दानपेटी वाकवून त्यामधील अंदाजे पाच ते सहा हजार रुपयांची रक्कम चोरून नेण्यात आल्याचे प्राथमिक माहितीतून समोर आले आहे.

सकाळी सेवेकऱ्यांच्या निदर्शनास आला प्रकार सकाळी मंदिरातील सेवेकरी लोटन आण्णा पाटील व नितीन सोनार हे नियमित सेवेसाठी मंदिरात आले असता त्यांना मंदिराचे कुलूप तुटलेल्या अवस्थेत दिसून आले. मंदिरात पाहणी केली असता दानपेटी फोडून त्यातील रक्कम चोरीला गेल्याचे लक्षात आले. घटनेची माहिती मिळताच केंद्रातील सेवेकरी गोपी शिंदे, राज निकम आणि महारूभाऊ पाटील यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली.